ई-मेल द्वारे

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र राज्य**

**राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सशक्त पंचायत सतत् विकास

**साखर संकुल, तळ मजला, साखर आयुक्तालय, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५**

@rgsamaharashtra Rgsa Maharashtra YouTube RGSAMAHARASHTRA rgsamaharashtra Koo @Maharashtrargsa

जा.क्र.राग्रास्वअ/ ग्रा.स.मो./ 11 /2023-24 दि. 2 / 1 / 2024

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सर्व (पेसा जिल्हे)

विषय – पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्राम सभा मोबिलायझर्सची नव्याने पद भरतांना अनुसरावयाच्या बाबींबाबत ...

संदर्भ – 1. उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे कडील शासन परिपत्रक क्र:रागांपं-2016/प्र.क्र.101/यो-4 दि.22/06/2016 व दि.22/01/2018

2. ग्राम विकास विभागाकडील शा.नि.राग्रास्वअ-2022/प्र.क्र.40/आस्था-15 दि.16/09/2022

3. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.गांप-2018/प्र.क्र.166/योजना-4 दि.02/07/2018

4. ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र.राग्रास्वअ 2022/प्र.क्र.40/आस्था-15 दि.25/07/2023

महोदय,

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत पेसा अंतर्गत ग्रामसभांचे संसंगीकरण (Mobilisation) करण्यासाठी आणि पेसा नियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीच्या दृष्टीने महिला बचत गटांमार्फत संदर्भ क्र. 1 अन्वये निवड केलेल्या ग्राम सभा मोबिलायझर मार्फत ग्राम सभांचे संसंगीकरण (Mobilisation) करण्यात येते व यामध्ये ग्राम सभा मोबिलायझर्स यांचे मासिक मानधन रक्कम रु.2500/- प्रमाणे नमूद आहे. यामध्ये संदर्भ क्र. 2 अन्वये सुधारणा करण्यात आली असून राज्य शासनाने पेसा क्षेत्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या ग्रामसभा मोबिलायझर यांना रु.4,000/- मासिक मानधन मंजूर केलेले आहे.

केंद्र शासनाने ग्राम सभा मोबिलायझर यांचे वाढविलेले मानधन विचारात घेता, त्यांचेकडून शासनाच्या शासन परिपत्रक दि.22/1/2018 अन्वये निश्चित केलेल्या जबाबदा-या पार पाडण्यासाठी त्यांच्या कामाचा गट विकास अधिकारी / जिल्हा व तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांनी नियमितपणे आढावा घ्यावा. त्याचप्रमाणे जिल्हा व तालुका प्रशिक्षण समन्वयकांनी नियमितपणे पेसा गावांना भेटी देवून त्यांच्या कामांचे सनियंत्रण करावे.

तसेच संदर्भ क्र. 3 अन्वये या पदांच्या मंजूर आकृतीबंधाच्या मर्यादेतील रिक्त पदे भरणेस मंजूरी देणेचे अधिकार संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत. कांही जिल्हयांकडून रिक्त पदे भरण्यापूर्वी संचालक, पंचायत राज यांची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

या अनुषंगाने पुन्हा निदर्शनास आणून देण्यात येते की, पेसा जिल्हयामध्ये पेसा मोबिलायझर्स पदांच्या मंजूर आकृतीबंधाच्या मर्यादेतील रिक्त पदे भरावयाची असल्यास, प्रथम या कार्यालयाची परवानगी घेण्यात यावी, या कार्यालयाच्या परवानगीशिवाय नियुक्ती केल्यास, त्यांना मानधन अदा करता येणार नाही. याबाबत संबंधितांस आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

तसेच अनुसुचीत क्षेत्रात नव्याने पेसा ग्रामपंचयतीचा समावेश झाला असल्यास व तेथे ग्रामसभा मोबिलायझर हे पद भरावयाचे असल्यास, पेसा गावे जाहीर झाल्याबाबत शासनाकडील आदेश, notification व इतर अनुषंगिक कागदपत्रासह प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

संचालक, पंचायत राज
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत –
संचालक, पेसा कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव.

f:\dalwale\harddisk_shilpa_rgsa_01-jan-2017\2023.2024\1.2023-202424_s_rgsa letter.doc

email - spdmaharashtra@gmail.com